बुधवार दि.३ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२२
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

## अशोक चव्हाणांची स्वत:ची ओळख काय?

# त्यांनी काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावली-प्रदेशाध्यक्ष नाना पटोले



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजप खासदार अशोक चव्हाण यांची स्वतःची ओळख काहीच नाही. त्यांनी केवळ काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावण्याचे काम केले, अशी तिखट टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी अशोक चव्हाण यांच्यावर निशाणा साधताना केली आहे.अशोक चव्हाण यांनी नुकतीच काँग्रेसला राज्यात कुणीही विचारत नसल्याची टीका केली होती. त्यांच्या या टीकेला नाना पटोले यांनी जशासतसे प्रत्युत्तर दिले. महाराष्ट्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात काम करणारा मोठा वर्ग आहे. महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप अंतिम झाले नाही. त्यांनी प्रकाश आंबेडकरांना चांगले वागवले नाही. यामुळे ते नाराज झाले. काँग्रेसवर इतर घटकपक्षही नाराज आहेत. यामुळे काँग्रेसची फरफट सुरू आहे. विशेषतः काँग्रेसच्या राज्यातील विद्यमान नेतृत्वामुळे काँग्रेसवर ही वेळ आली आहे, असे चव्हाण म्हणाले होते.

नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांच्या या टीकेचा चोख समाचार घेतला. भाजपचे नेते भ्रष्टाचारी नेत्यांसाठी आपली कवाडे खुली असल्याचे सांगतात. अशोक चव्हाण यांनी काँग्रेसच्या भरवशावर मालमत्ता कमावली. भ्रष्टाचार केले. सत्ता उपभोगली. आता ते भाजपत गेले. अशोक चव्हाण यांची स्वतःची ओळख काय? त्यांच्या मतदार संघातही त्यांची स्थिती चांगली नाही. त्यामुळे काँग्रेसवर टीका करण्यापेक्षा त्यांनी स्वतःचे पहावे. काँग्रेसवर बोलू नये, असे नाना पटोले म्हणाले.नाना पटोले यांनी यावेळी काँग्रेस विदर्भातील पहिल्या टप्प्यातील लोकसभेच्या पाचही जागा जिंकणार असल्याचाही दावा केला. काँग्रेस योग्य वेळेची वाट पाहत आहे. आम्ही ४ दिवसांत प्रकाश आंबेडकरांना योग्य ते उत्तर देऊ. आजपासून काँग्रेसचा पहिल्या टप्प्यातील प्रचार सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यातील पाचही जागा काँग्रेस जिंकेल असे आजचे चित्र आहे, असे नाना पटोले म्हणाले.माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काही दिवसांपूर्वीच काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर भाजपने तत्काळी त्यांनाी राज्यसभेवर पाठवले होते. त्यानंतर आता ते लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागलेत. पण त्यांना मराठा आंदोलकांचा तीव्र विरोध होताना दिसून येत आहे. भाजपचे नांदेडचे उमदेवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारासाठी ते सोमवारी एका गावात गेले असता तिथे त्यांची गाडी अडवण्यात आली. यामुळे त्यांना प्रचार न करताच आल्यापावली परत फिरावे लागले.

---

### आला आला 'उन्हाळा' आता आरोग्य सांभाळा

## सिडको एन-८ रुग्णालयात डॉक्टरांच्या वतीने करण्यात आले मार्गदर्शन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । सुनील वैद्य**

'आयुष्यमान भव ' कार्यक्रमांतर्गत उन्हाळ्यात होणाऱ्या उष्माघातापासून बचाव करण्यासाठी व आरोग्याची काळजी घेण्यासाठी मनपा च्या रुग्णालयामध्ये मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते .

सिडको एन-८ येथील रुग्णालयात उष्माघाताचे होणारे परिणाम व यापासून बचाव करण्यासाठी रुग्णालयातील उपस्थित असलेल्या रुग्णांना मार्गदर्शन करण्यात आले .उष्माघातापासून बचाव कसा करावा .उन्हाळ्यात आरोग्याची कशी काळजी घ्यावी .उष्माघाताची लक्षणे आढळल्यास कोण -कोणते प्रथमोपचार करावे .तापमानाचे प्रमाण अधिक वाढले आहे. उन्हाळ्यात शरीरातील पाणी कमी होत असते .यासाठी जास्तीत जास्त पाणी प्यावे उष्माघाताची लक्षणे आढळल्यास १०८ या नंबर वर संपर्क करावा . तसेच तात्काळ रुग्णाला दवाखान्यात हलवावे यासह विविध विषयावर यावेळी डॉ . मेघा जोगदंड , डॉ . कल्पना राठोड यांनी सविस्तर मार्गदर्शन केले .यावेळी सुनिता भोसले, शिवाजी गाडे ,गीता हलगडे यांच्यासह अन्य कर्मचारी यावेळी उपस्थित होते .

---

### लिंबागणेशच्या संवेदनशील मतदान केंद्राचा

## अपर पोलीस अधिक्षक चेतना तिडकें कडुन फेव्हिस्टिक प्रकरणाचा आढावा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील फेविस्टीक प्रकरणामुळे संवेदनशील असलेल्या मतदान केंद्राचा आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काल दि.१ सोमवार रोजी अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी पोलिस पथकासमवेत आढावा घेतला.यावेळी नेकनुर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे ,लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे.संतोष राऊत, नवनाथ मुंढे आदि उपस्थित होते.

दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत ईव्हीएम मशिन मध्ये फेविस्टीक टाकल्याचा प्रकार घडला होता.संबधित प्रकरणी केंद्र प्रमुखांच्या फिर्यादीवरून नेकनुर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्यामुळे दि.२३ डिसेंबर रोजी फेरमतदान घेण्यात आले होते. मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांच्याशी संवाद साधत मतदान केंद्राचा आढावा घेतल्यानंतर गावातील प्रमुखांची ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेतली. निवडणुक आयोगाने कठोर धोरण अवलंबिले असुन लोकशाहीला घातक प्रकार घडता कामा नयेत यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव,ग्रां.स. दामु थोरात,समीर शेख,जिवन मुळे, सुखदेव वाणी, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे न,सय्यद ताहेर, पत्रकार हरिओम क्षीरसागर व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

## हळदव,चितळी,हिप्परगा रस्त्याचे काम चालू - बंद चा खेल नागरिक वैतागले

### लवकर काम न चालू केल्यास ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा शहरातून हळदव,चितळी, हिप्परगा मार्गे पालम तालुक्यातील पेंडू कडे जाणाऱ्या रस्त्याचा कामाचे गेलेल्या पाच ते सहा वर्षांपासून बंद - चालू चा खेळ चालू आहे. लोहा तालुक्यातील अनेक गावातील भाविक हजारो भावी भक्त हळदव, चितळी, हिप्परगा मार्गे पालम तालुक्यातील पेंडू येथे असलेले श्रीक्षेत्र निवृत्ती महाराज यांच्या दर्शनासाठी दर पंधरवड्या एकादशीला पायी वारी जात असतात. तसेच लोहा हे तालुक्याचे ठिकाण व येथे मोठी बाजारपेठ असल्याने या रस्त्यावरून वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा चालू असते.

त्यात रखडलेल्या रस्त्याचे काम कधी सुरू तर कधी बंद अशी अवस्था असल्यामुळे अक्षरशा चितळी काबेगाव हिप्परगा येथील नागरिक वैतागले आहेत लवकरात लवकर रस्त्याचे काम सुरू न केल्यास येणाऱ्या काळात तीव्र आंदोलनाचा इशारा चितळी येथे ग्रामस्थांनी केला आहे.पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषदेचे लोहा तालुका अध्यक्ष पांडुरंग पाटील पवार यांनी निवेदन देवून सदरील कामाबद्दल निषेध व्यक्त केला व उपोषणाचा इशारा दिला.

---

### संगमनेर तालुक्यात १७ गावे व ५२ वाड्यावस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर**

संगमनेर तालुक्यामध्ये पाणीटंचाई सुरू झाली आहे. सध्या पंचायत समितीमार्फत १७ गावांना व ५२ वाड्या-वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती टंचाई विभागाचे प्रमुख संजय अरगडे यांनी दिली. मागील वर्षाच्या तुलनेमध्ये अल्प पाऊस पडल्यामुळे तालुक्याला भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागणार आहे. जनावराच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला. त्यातच लोकसभेच्या निवडणुकीची आचारसहिता जाहीर झाल्याने शासकीय अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या कामकाजाकडे लक्ष द्यावे लागणार आहे.निळवंडे उजव्या व डाव्या कालव्यातून सुमारे चार टीएमसीहून अधिक पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे पाटालगतच्या गावांमध्ये विहिरीतील पाण्याची पातळी वाढली होती. मात्र आता ती खाली जाऊ लागल्याने सर्वच ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे.

---

### चारोळी

**वेड्यावल्या वाटेचा ध्यास**
**कधीतरी बाळगावा**
**खाचखळग्याचा अनुभव**
**दुसऱ्यालाही कळवावा.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

---

## हिंगोली लोकसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी पाच उमेदवारांकडून आठ अर्ज दाखल

### १५ उमेदवारांना ६० नामनिर्देशन पत्राचे वितरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । भगवान जाधव**

हिंगोली लोकसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी आज उमेदवारांकडून आठ नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिली.

हिंगोली लोकसभा निवडणुकीच्या नामनिर्देशन प्रक्रियेला गुरुवार, दि. २८ मार्चपासून सुरुवात झाली आहे. या मतदार संघासाठी २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. आज नामनिर्देशनपत्र वितरण व स्विकृतीच्या चौथ्या दिवशी १५ उमेदवारांना ६० अर्जांचे वितरण करण्यात आले असून, आतापर्यंत एकूण ८६ इच्छुक उमेदवारांना ३०३ नामनिर्देशनपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. तर चौथ्या दिवशी आज मंगळवार, दि. ०२ एप्रिल रोजी ५ उमेदवारांनी ८ नामनिर्देशन अर्ज दाखल केली आहेत. त्यामुळे आतापर्यंत दाखल केलेल्या नामनिर्देशन अर्जांची संख्या १० झाली आहे. आज दाखल केलेल्या नामनिर्देशन अर्जाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

श्री. नामदेव ग्यानोजी कल्याणकर (अपक्ष) यांनी दोन अर्ज, श्री. रवि यशवंतराव शिंदे (ओबीसी बहुजन पार्टी) यांनी एक अर्ज, श्री. देशा शाम बंजारा (अपक्ष) यांनी एक अर्ज, श्री. वसंत किसनराव पाईकराव (अपक्ष) यांनी दोन अर्ज व श्री. नागेश बाबुराव पाटील आष्टीकर (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, अपर जिल्हाधिकारी खुशाल सिंह परदेशी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांच्यासह याकामी नियुक्त अधिकारी -कर्मचारी उपस्थित होते.

एका उमेदवारास जास्तीत जास्त ४ अर्ज घेता येतात. नामनिर्देशनपत्रे ४ एप्रिलपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत सादर करता येतील. शुक्रवार, दि. ५ एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रांची छानणी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४ रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे.

---

## मंठा शहरातील बुलेट दुचाकीचे सायलन्सर व हॉर्न बदलुन कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेटधारकावर मंठा पोलीसांची कार्यवाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**रमेश देशपांडे । मंठा**




मंठा शहरातील गेल्या काहि महिण्यापासुन बुलेट दुचाकी व कालबाह्य झालेल्या दुचाकीचे सायलेन्सर व हॉर्न बदलुन शहरातील मुख्य रस्त्यावर गल्ली बोळातुन सायलन्सरचे फटाके फोडत हॉर्नचा कर्णकर्कश आवाज करत बुलेट चालक त्यांची बुलेट सुसाट वेगाने पळवत आहेत. सायलेन्सर व हॉर्नच्या अचानक झालेल्या आवाजमुळे लहान बालके दचकुन जागे होतात व भयभीत होतात यासह जेष्ठ नागरीक व वृद्ध यांनादेखील याचा त्रास होत असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मंठा पोलीस स्टेशन येथे एक विशेष पथक नेमण्यात आले.

सदर नेमण्यात आलेल्या विशेष पथकाने दि.०२/०४/२०२४ रोजी मंठा शहरात चालणा-या व कर्णकर्कश आवाज करणा-या बुलेट क्र.१) चक२१उइ५५८१, २)चक४७त७४३५, ३)च-१७०५५, ४)चक४४ध७७६८, ५)चक२१क२२४९ अशा पाच बुलेट ताब्यात घेवुन त्यांचे कर्णकर्कश आवाजाचे सायलन्सर व हॉर्न बदलुन त्यांच्या जागी मुळ सायलन्सर व हॉर्न बसवुन सदरच्या बुलेट धारकावर दंडात्मक कार्यवाही करुन त्यांच्याकडुन १०५००/- रुपये दंड वसुल करुन सदरच्या बुलेट मुळ मालकाच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. फटाका आवाज करणा-या बुलेटची माहिती द्यावी नाव गोपनिय ठेवण्यात येईल तसेच यापुढे फटाका आवाज करणा-या बुलेट मिळुन आल्यास सदर बुलेट जप्त करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे आवाहन पोलीस निरीक्षक आर.डी. निकाळजे यांनी केले आहे.सदरची कार्यवाही मा.श्री.आर.डी. निकाळजे पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे मंठा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बलभिम राऊत, पोना/सतिष आमटे, पोकाँ आनंद ढवळे, पोकाँ/आकाश राऊत, पोना/शाम गायके, पोकाँ/मनोज काळे, ५,पोकाँ/लिंबाळकर, पोकाँ/लिंबाळकर, पोकाँ/आसाराम प मदने, पोकाँ/माधव वाघ, पोकाँ/विजय जुंबडे यांनी केली आहे.

## संपादकीय

# अर्थसंकल्प एक प्रकारचा कायदाच



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आपले एक आर्थिक वर्ष कालच संपले, आर्थिक वर्षाच्या संदर्भात दरवर्षी एका दिवशी संसदेत काय होत आहे, याची सर्वच जण वाट बघत असतात. तो दिवस म्हणजेच संसदेत अर्थसंकल्प सादर होण्याचा दिवस. या अर्थसंकल्पात काय आहे, याची सर्वांनाच उत्सुकता असते. अर्थसंकल्पाची तरतूद भारतीय राजघटनेत आहे.भारतीय राज्यघटनेत अर्थसंकल्पाला 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' असा शब्द वापरला आहे. अर्थसंकल्पात भारत सरकारकडे पैसे कोणकोणत्या माध्यमातून येतील आणि ते कुठे कुठे खर्च केले जातील, याचे विवरण असते. एक प्रकारे पुढील वर्षभर देशाचा खर्च चालवण्यासाठी संसदेची मान्यता घेण्याची ही प्रक्रियाच असते.अर्थसंकल्प म्हणजे देखील एकप्रकारे कायदाच असतो. दरवर्षी राष्ट्रपतींच्या अनुमतीने हा अर्थसंकल्प संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर केला जातो. आर्थिक बाबींसंदर्भात वित्त विधेयके (ऋळपरपलश लळश्रश्र) आणि धन (चेपशू इळश्रश्र) विधेयके हे विधेयकांचे दोन प्रकार आहेत.कोणताही नवीन कर लावण्याबाबतचे धन विधेयक अथवा वित्त विधेयक हे राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय सादर केले जाऊ शकत नाही. तसेच नवीन कर लावण्याबद्दलचे विधेयक हे राज्यसभेत सादर केले जाऊ शकत नाही, ते लोकसभेतच सादर करावे लागते. अर्थसंकल्पाच्या बाबतीत राज्यसभेला अत्यंत मर्यादित अधिकार असून राज्यसभेला अर्थसंकल्प फेटाळण्याचे अधिकार नसून केवळ सुधारणा सुचविण्याचे अधिकार आहेत. लोकसभा या सुधारणा स्वीकारू शकते अथवा नाकारून अर्थसंकल्प संमत करू शकते.अर्थसंकल्पातील भारताच्या एकत्रित निधीतून केल्या जाणाऱ्या खर्चावर म्हणजेच राष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधीश आदींचे पगार अथवा कोणत्याही कायद्यामध्ये सूचित केला गेलेला एकत्रित निधीतील खर्च याबाबत लोकसभेत मतदान होत नाही, त्यावर केवळ चर्चा होऊ शकते.

अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर संसदेच्या सभागृहात विभागनिहाय चर्चा होते, तसेच विविध विभागांच्या संसदीय समित्यांकडून अर्थसंकल्पाची चिकित्सा व अभ्यास केला जातो. त्यानंतर अर्थसंकल्पावर विभागनिहाय मतदान होते.अर्थात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे हे मतदान केवळ लोकसभेत होते. त्यानंतर अर्थसंकल्पातील मंजूर बाबींचे विनियोजन विधेयकात रूपांतर होते. या विधेयकास राष्ट्रपतींनी संमती दिल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होते. एखाद्या विशिष्ट बाबतीत किंवा एकापेक्षा अनेक बाबतीत अर्थसंकल्पात केली गेलेली तरतूद अपुरी पडत आहे, असे लक्षात आल्यास वित्तीय वर्षात कधीही पुरवणी मागण्या सादर करून त्याबाबतची तरतूद केली जाऊ शकते.अर्थसंकल्पामध्ये विविध निधींची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये सरकारला मिळालेला सर्व महसूल व कर, कर्जे व कर्जांच्या परतफेडीदाखल मिळालेला पैसा, हे सर्व मिळून भारताचा एकत्रित निधी तयार होतो.या निधीतील एक रुपयादेखील सरकारला संसदेच्या संमतीशिवाय वापरता येत नाही. तसेच एकत्रित निधीत जमा झालेला पैसा सोडून बँकांतील रकमांवर मिळालेले व्याज इत्यादी निधी हा राज्य एकत्रित निधीत जमा होतो, हा पैसा खर्च करण्यासाठी संसदेच्या मंजुरीची गरज नसते. राज्यघटनेद्वारे आकस्मिकता निधी कायदा करण्याचे संसदेला सूचित करण्यात आले आहे. हा निधी सरकारला आपत्कालीन परिस्थितीत वापरता येतो.धन विधेयक आणि वित्त विधेयकात तांत्रिक स्वरूपाचा फरक आहे. एखादे विधेयक हे धन विधेयक आहे अथवा नाही यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा लोकसभेच्या अध्यक्षांना आहे. यापूर्वी असेही आढळून आले आहे की, राज्यसभेत एखादे विधेयक मंजूर होण्यास काही अडचणी दिसत असल्यास सदर विधेयकाला धन विधेयक बनवून अशा विधेयकास राज्यसभेच्या मंजुरीची गरजच नसल्याची घटनात्मक परिस्थिती निर्माण केली जाते.धन विधेयक लोकसभेने संमत करून राज्यसभेकडे पाठवल्यानंतर ते चौदा दिवसांच्या आत मंजूर करून अथवा शिफारशींसह राज्यसभेला लोकसभेकडे पाठवावे लागते. अशा शिफारशी स्वीकारायच्या अथवा नाही याचा अंतिम अधिकार लोकसभेचा आहे.भारतीय राजघटनेच्या कलम २६५ नुसार कायद्याने अधिकार दिल्याशिवाय कोणताही कर आकारला अथवा वसूल केला जाऊ शकत नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. अर्थसंकल्पी चर्चेमध्ये कपात सूचना नावाचे संसदीय आयुध असून, त्याद्वारे विरोधी पक्ष अर्थसंकल्पात कपात करण्याचे सुचवतो. अशी कपातसूचना मान्य झाल्यास तो सरकारचा मोठा नैतिक पराभव मानला जातो. एकंदरच देशाचा अर्थसंकल्प ही अत्यंत किचकट अशी प्रक्रिया आहे, मात्र ही किचकट प्रक्रिया पार पाडल्याशिवाय कोणत्याही सरकारला गत्यंतर नसते!

# समाधानाचा शोध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

निसर्ग जादूगार आहे. त्याच्या सान्निध्यात पावलोपावली आनंद मिळतो. सूर्य, चंद्र, तारे यांचे उगवणे रोजचे असते, तरीही ते रोज नित्य नवे भासते. बदलणारे ऋतू, ऋतुमानाप्रमाणे येणारी फळे, फुले मनाला मोहवितात. आनंद देतात

आपल्या अवतीभवती आनंदाच्या बागा फुललेल्या असतात; त्यांचा गंध श्वासात भरून घ्यायला शिकले पाहिजे. आवडणारी निवडक फुले वेचता आली पाहिजेत. आपला दृष्टिकोन मात्र सकारात्मक व दृष्टी सजग हवी. एक सुंदर भजन आहे.

'आज मी आहे आनंदात, आहे आनंदात.

आनंदाचे झाड बाई माझ्या अंगणात.'

अंगणात आनंदाचे झाड असल्यावर काय? सगळ्यांच्या अंगणात ते असावे व असतेच.

'सुख पहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे,' ही उक्ती बाजूला सारून, 'दुःख पहाता जवापाडे सुख पर्वताएवढे' असा आम्हाला धडा होता. त्यावेळी तो तेवढा कळला नव्हता, पण आता पुसटसा आठवतो. जीवन संघर्षमय असते. श्रम असतात. प्रियजनांचा वियोग असतो. पण आपण जगणे सोडत नाही. दिनक्रम सुरूच असतो. मग रडत, आंबट तोंड करून का जगायचं? आहे तो क्षण, दिवस आनंदात का जगू नये? असा काहीसा आशय होता त्यात.निसर्ग



जादूगार आहे. त्याच्या सान्निध्यात पावलोपावली आनंद मिळतो. सूर्य, चंद्र, तारे यांचे उगवणे रोजचे असते, तरीही ते रोज नित्य नवे भासते. बदलणारे ऋतू, ऋतुमानाप्रमाणे येणारी फळे, फुले मनाला मोहवितात. आनंद देतात. चैत्रपालवीचा आनंद वेगळा तर श्रावणसरींचा वेगळा. प्राणी, पक्षी, डोंगर, नद्या, समुद्र, आकाश , झाडं, वेली ही सारी निसर्गाची देणगी आनंद देते. आपण डोळस असावे लागते. दैनंदिन कामातूनही आपण आनंद मिळवू शकतो. लवकर जाग येऊन भरभर कामे आटोपली की आनंद होतो. बस, रिक्षा वेळेवर मिळाली, वेळेवर ऑफिसला पोचलो. या साऱ्याचा आनंद वाटतो.घराची सुंदर सजावट केली की, रुचकर स्वयंपाक झाला की, पूजापाठ वेळेत झाले की, पाहुणे जेवून तृप्त होऊन गेले की गृहिणी आनंदी होते. मुलांची प्रगती, मुलांची लग्ने, नातवंडे यांत ती आनंद शोधते. कमरेवर दळणाचा डबा किंवा हातात भाजीची पिशवी घेऊन रस्त्यात मैत्रिणीसोबत तासभर गप्पा मारण्यातही ती आनंद शोधते.रांगोळी काढण्याचा माझा नेम आहे. सडा घातलेल्या ओलेत्या अंगणात रांगोळी रेखली व त्यावर चिमूटभर हळदीकुंकू घातले की ती अधिकच सुंदर दिसते. माझी रांगोळी पाहून मीच आनंदी होते. येणारे जाणारेही कौतुक करतात, मग अधिक आनंदी होते. घरासमोर एक इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. दुपारच्या जेवण्याच्या वेळी लहान मुले एक छान प्रार्थना म्हणतात. 'थँक्यू गॉड फॉर एव्हरीथिंग' अशी ती प्रार्थना आहे. खूप छान वाटते ऐकताना. मनातल्या मनात मीही ती प्रार्थना म्हणते. आनंदी होते. रस्त्यावरची रहदारी, शाळा, कॉलेजची मुले, फेरीवाले, स्कूलबसमधून डोकावणारी बच्चेकंपनी... सारे काही विरंगुळा देते.घरामागे मोठ्ठे शेत आहे. गोठा आहे. स्वयंपाकघरात काम करताना शेतातल्या हिरवाईच्या विविध छटा मनाला भुरळ पाडतात. कडेने दाट झाडी आहे. विविध पक्षी तेथे वास्तव्यास असतात. पक्ष्यांचा किलबिलाट आनंद देतो. कधीमधी खंड्या दर्शन देतो. हंबरणाऱ्या गायी, शेपटी वर करून बागडणारी वासरे पाहून मन आनंदी होते. ऋतुबदलाप्रमाणे शेताचे सौंदर्य वेगवेगळे भासते. सहा ऋतूंचे सहा सोहळे बघताना मन तृप्त होते. आपसूकच आनंदी होते.आनंद आपल्या अवतीभवतीच असतो तो शोधावा लागतो. आनंद क्षणभंगुर असतो, म्हणून तो नित्यनेमाने शोधावा लागतो. कधी वाचनातून, कलेतून, छंदातून, पर्यटनातून जे आवडेल त्यातून. आनंदाच्या कल्पना व्यक्तिसापेक्ष असतात. प्रत्येकाची आनंदाची परिभाषा वेगळी असू शकते. मनाची मधमाशी निखळ आनंद शोधणारी हवी. ती बरोबर आनंदाचे झाड, फुले शोधून आनंद गोळा करून आणते.

# भारतीय नौदलाचा 'संकल्प'

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मागील आठवड्यात हे जहाज पुन्हा आंतरराष्ट्रीय समुद्रात येताच नौदलाने वेळ न दवडता कारवाई केली. यावेळी चाच्यांकडून तुफान गोळीबार झाला; मात्र अतिशय धैर्याने नौदलाने ही मोहीम फत्ते करून सर्व १७ कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका केली.भारतीय नौदलाने अतुलनीय शौर्य गाजवत तब्बल ४० तासांच्या झुंजीनंतर ३५ समुद्री चाच्यांना जेरबंद करून नुकतेच मुंबईत आणले. या चाच्यांनी १५ डिसेंबरला सोकोत्रा या बेटाजवळ 'एमव्ही रुएन' या जहाजाचे अपहरण केल्याचे कळताच भारतीय नौदलाने टेहळणी विमानाद्वारे त्यावर नजर ठेवली होती. त्यानंतर त्वरेने हालचाली करून या जहाजाच्या मदतीला युद्धनौका पाठवण्यात आली; पण तोवर चाच्यांनी व्यापारी जहाज सोमालियाच्या समुद्री हद्दीत हाकारल्याने थेट कारवाई शक्य झाली नाही. मात्र, मागील आठवड्यात हे जहाज पुन्हा आंतरराष्ट्रीय समुद्रात येताच नौदलाने वेळ न दवडता कारवाई केली. यावेळी चाच्यांकडून तुफान गोळीबार झाला; मात्र अतिशय धैर्याने नौदलाने ही मोहीम फत्ते करून सर्व १७ कर्मचाऱ्यांची सुखरूप सुटका केली.जागतिक सागरी व्यापाराच्या नकाशावर अरबी समुद्राचे स्थान कळीचे आहे. बहुतांश व्यापारी जहाजे अरबी समुद्र, तांबडा समुद्र आणि एडनचे आखात या मार्गाने प्रवास करतात. एडनच्या आखातात सोमाली चाच्यांकडून लूटमार, जहाजांचे अपहरण आणि सुटकेच्या बदल्यात खंडणी हे सत्र सुरू असते. इस्रायल-हमास संघर्ष सुरू झाल्यानंतर या कारवाया प्रचंड वाढल्या; त्यामुळे चाचेगिरीचा कडवा प्रतिकार क्रमप्राप्त ठरला होता. त्यासाठीच अरबी समुद्रात नौदलाने



शंभर दिवसांची 'ऑपरेशन संकल्प' मोहीम हाती घेतली. या मोहिमेत तब्बल ४५० व्यापारी जहाजांना संरक्षण दिले गेले. त्यासाठी २१ युद्धनौकांसह पाच हजार नौसैनिकांनी अहोरात्र गस्त घातली. टेहळणी विमानांनी नऊशे तास उड्डाण केले. ४५ भारतीयांसह ११० खलाशांचे प्राण व १५ लाख टन सामग्रीचे संरक्षण केले. जलद हालचाली आणि छोट्या बोटी वापरून चाचे हवा तसा धुमाकूळ घालू शकतात, हा आजवरचा समज भारतीय नौदलाने खोटा ठरवला.आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत चाचेगिरी व्यवसाय म्हणून पुन्हा डोके वर काढू पाहत असल्याने ते रोखण्यासाठी सततच्या वेगवान कारवाया, हाच एक उपाय असल्याचे 'संकल्प'च्या माध्यमातून अधोरेखित झाले. ११ पाणबुड्यांसह 'ऑपरेशन संकल्प'मध्ये सुसज्ज क्षेपणास्त्रविरोधी आणि ड्रोनविरोधी यंत्रणा तैनात करण्यात आली.'सागरी चाचेगिरी कायदा २०२२' याचेही या कामगिरीस पाठबळ मिळत आहे. त्यामुळे अन्य देशांच्या अपहृत जहाजांवर उतरणे आणि शोध घेणे शक्य होते आहे. सुरक्षित आणि निर्धोक सागरी व्यापारासाठी भारतीय नौदलाच्या रूपाने जगाला अरबी समुद्रात एक भरवशाचा साथी मिळाला आहे.

# सुर्य आग ओकत आहे;उष्माघाता पासून स्वत:ला सांभाळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला.यामुळे उष्माघाताचे प्रमाण वाढु शकते अशा परिस्थितीत स्वतःला सांभाळणे अत्यंत गरजेचे आहे.यावर्षी वेळेच्या आधीच सुर्याने आक्राळ - विक्राळ रूप धारण केल्याचे दिसून येते आणि पुढे आणखी भयानक स्थिती निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत उष्णतामानासोबतच पाणी टंचाईचा सुध्दा सामना करावा लागणार आहे.कारण आतापासुनच नदि, तलाव, विहिरी यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात आपल्याला पहायला मिळेल.आतापासुनच महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार करून पुढील काही दिवसांत कठीण परिस्थितीत निर्माण करण्याची भीती वर्तवली जात आहे.सध्याच्या परिस्थितीत तापमानाचे वाढते प्रमाण याप्रमाणे अकोला सर्वाधिक तापमान ४२.६ अंश सेल्सिअस, वर्धा ४२.१, अमरावती ४१.८, यवतमाळ व ब्रम्हपुरी ४१.२,नागपूर ४१, गोंदिया ४०.२, व गडचिरोली ३९.२ इतके तापमान नोंदविण्यात आले आहे.हे तापमान फक्त विदर्भातील आहे.अशीच परीस्थिती संपूर्ण महाराष्ट्रा बरोबर देशातील अनेक भागात आपल्याला पहायला मिळेल.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्रास यामुळेच आज आपल्याला कठीण परिस्थितीचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदि-नाले,तलाव, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ आक्रमक करीत



असुन संपूर्ण निसर्ग ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचे प्रमाणात दिवसेंदिवस वाढत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त ४५ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.त्यामुळे वाढते प्रदुषण व वाढते तापमान पहाता घराच्या बाहेर निघताना डोक्याला व काणाला दुपट्टा बांधुन निघने, वाढते उष्माघाताचे प्रमाणात पहाता भरपूर पाणी पीने. वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन केले आहे.वाढत्या उष्णतामानामुळे उन्हात फिरल्याने डोके दुखी,ताप येणे, जास्त घाम येणे, चक्कर येणे, बेशुद्ध पडने अशा पध्दतीची साधारणतः उष्माघाताची लक्षणे जानवु शकतात.यावर प्रार्थमिक उपाय म्हणून स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे.सावलीचा सहारा घेणे, थंड पेय घेणे,नारळाचे पाणी पिने, साधारणतः बाहेर निघताना कॉटनचे सैल कपडे घालावेत आणि जास्तच अस्वस्थ वाटत असेल डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.कारण वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे अत्यंत गरजेचे आहे.सोबतच राज्यासह देशातील नागरिकांना विनंती करेल की वाढत्या तापमानामुळे मानवासाठी उष्माघाताचा धोका आहे.यावर आपण उपाय पण शोधणार.परंतु आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**

# रुग्णांची हेळसांड करणाऱ्या डॉक्टरांना अभय किंवा पाठीशी घातल्याने प्रामाणिक डॉक्टरांनाही गालबोटाची शक्यता

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर: बहुतांश हिंदूलोक ईश्वराला आवळतात, पूजा अर्चना करतात आणि सूखसमृद्धीसाठी प्रार्थना करतात. संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माची भगवी पताका घेऊन विठ्ठलाला शरण गेले तसेच संत शिरोमणी तुकारामांनी आपला वडिलोपार्जित व्यवसाय सोडून विठ्ठला चरणी लीन झाले मात्र त्यांना देव दिसला नाही म्हणून माणसात देव शोधून त्यांची सेवा केली तरच प्रभू प्राप्त होतो असे गृहीत धरून मोक्ष मिळविला. विज्ञानाने प्रगती करून विविध रोग व त्यावरील उपचार शोधून काढलेले आहेत त्यायोगे कित्येकांनी डॉक्टरीचे शिक्षण घेऊन रुग्णसेवेचा वसा चालविला मात्र या धंद्यात त्यांनी मिळकत जास्त मिळत असल्याने त्यांनी या व्यवसायाला टाकसाळीचे स्वरूप देऊन माणुसकीला काळीमा फासला आहे. वारंवार अशा प्रकारच्या चुकीच्या उपचार केल्याने प्रामाणिक डॉक्टरकी व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनाही अशांमुळे गालबोट लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सर्वसामान्य रुग्ण किंवा माणूस देव जरी म्हणत असला तरी काही डॉक्टरांकडून कसायाचे काम सुरू असलेल्या सम व्यावसायीक डॉक्टरांनी अशांना साथ न देता रुग्णांचे हित जपावे अशी भावना सर्व सामान्य माणसात निर्माण झाली आहे.शहरातील चाळीस बिघा परिसर हा रुग्णालयाचा परिसर म्हणून ओळखला जातो.मात्र रुग्णांची सेवा शुश्रुषा न करता रुग्णांची अवहेलना करीत त्यांची आर्थिक लूट करण्यात येत असल्याचे चित्र स्पष्ट आहे. विशेष या परिसरात विशेषज्ञ डॉक्टरांचा भरणा असल्यावरही बहुतांश डॉक्टर मद्यप्राशनाच्या व्यसनात गुंतलेले असल्याने रुग्णालयात आकस्मिक रुग्ण आल्यास त्याची तारांबळ उडते व ते जखमा किंवा फ्रॅक्चर न पाहता ताबडतोब ऑपरेशनची रक्कम सांगून मोकळे होतात. तसेच ऑपरेशन त्वरित केले नाही तर हा अवयव निकामी होईल अशी धमकी रुग्णांच्या नातेवाईकांना देण्यात येत असल्याने नातेवाईक सुद्धा त्यांच्या हाता पायात पडून ऑपरेशन करण्यास संम्मती देतात असेच कित्येक वेळा झालेले आहे. तर ऑपरेशन करतांना काही चूक झाल्यास किंवा परिस्थिती आटोक्यात राहिली नाही तर जळगाव, अकोला व औरंगाबाद येथे रुग्णालयात जाण्याचा सल्ला देतात. वास्तविक डॉक्टरांना रुग्णांची इतंभुत माहिती असणे आवश्यक असते व त्या माहितीवर रुग्णांचा मृत्यू होणे किंवा जीव वाचवणे शक्य असते मात्र डॉक्टर रुग्णांच्या नातेवाईकांना कोणतिही माहिती न देता आपल्याशी संबंधित असलेल्या डॉक्टरची चिठ्ठी देउन आपल्या जबाबदारीतून मुक्त होतो मग तिकडे रुग्णांचा मृत्यू हो किंवा तो जिवंत राहो याकडे लक्ष देत नाही वास्तविक डॉक्टरने रुग्णाला दाखल केल्यानंतर, तपासणी केल्यानंतर त्यांच्या तब्येतीबाबत सांगावयास पाहिजे परंतु पैसे ओढण्यासाठी फक्त धावपळीचा देखावा निर्माण करण्यात येतो.मागील महिन्यात एका डॉक्टरच्या रुग्णालयात गर्भपिशवी काढण्याच्या ऑपरेशन मध्ये महिलेस जास्त रक्तस्त्राव झाल्याने व परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतर तिला बुलढाणा येथे हलविण्यात आले होते तर उपचारानंतर तिचा करून अंत होऊन तिच्या एकुलत्या एक मुलाचे छत्र हरविले होते दुसऱ्या एका प्रकरणात किशोरावस्थेत असणाऱ्या मुलावर पाय कापण्याची पाळी एका डॉक्टरने योग्य उपचार केला नसल्याने आली होती परंतु दुसऱ्या डॉक्टरांकडे त्याचा योग्य उपचार झाल्याने त्याचा पाय सुव्यवस्थित असल्याचे समजते मात्र त्याच्या आई-वडिलांना शारीरिक,मानसिक व आर्थिक संकटांना सामोरे जावे लागले आहे. सदरचा मुलगा एकुलता असल्याने मुलाच्या आईने निवेदन घेऊन फिर्याद नोंदविण्यास गेली असता पोलीस प्रशासनाने तिचे अश्रु न पुसता तिला योग्य उपचार न करणाऱ्या डॉक्टरांकडे जाण्याचे फर्मान सोडुन कोणतीही कारवाई केली नाही.काही डॉक्टरांची याप्रकरणी प्रतिक्रिया उमटली आहे परंतु पोलीस प्रशासन राजकिय क्षेत्रात अग्रणी असलेल्या डॉक्टरांच्या माध्यमातून मूग गिळून बसलेले आहे. त्यामुळे तज्ञ असलेल्या समव्यवसायिक डॉक्टरांनी किमान अशा बेजबाबदार व आपल्या रुग्णसेवेला टाकसाळीचे स्वरूप देणाऱ्या डॉक्टरांना पाठीशी घालू नये अशी चर्चा सर्वसामान्यात सुरू आहे.

# निर्मिक कोचिंग क्लासेसच्या वतीने वर्ग दहावीचा निरोप समारंभ व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेलू । प्रतिनिधी**




सेलू ३१ मार्च रविवार रोजी शहरातील हुतात्मा स्मारक परिसरातील योगा हॉल मध्ये निर्मिक कोचिंग क्लासेसच्या वतीने दि ३१ मार्च रविवार रोजी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटक माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.शिवाजी शिंदे,सामाजिक कार्यकर्ते सुनील गायकवाड, प्रा मदन इदगे, संचालक शुकाचार्य शिंदे, पि.के .शिंदे ,बबन घुले ,बापुराव डाके, हरिभाऊ बरसाले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्लासेसचे संचालक शुकाचार्य शिंदे यांनी केले. माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी परिश्रम करून यश संपादन करावे असे प्रतिपादन केले.डॉ.शिवाजी शिंदे यांनी विद्यार्थ्यांची वाचनाची आवड वाढण्याबद्दल मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे पि. के.शिंदे यांच्या 'या झोपडीत माझ्या ' या गिताने विद्यार्थ्यांचा मनाचा ठाव घेतला. कार्यक्रमात एस. एस. सी. मार्च २०२३ परीक्षेत इंग्रजी विषयात ९८ गुण प्राप्त करुन राज्यात तृतीय आणि क्लासमधून प्रथम आलेली त्रिवेणी डाके या विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सानिका तांगडे , नम्रता पवार, पुनम घुले, अंजली साखरे ,रवी जोगडे, ज्ञानेश्वर पौळ, कीर्ती पवार, भक्ती चाफेकर, ज्ञानेश्वरी भगस आदी एस. एस. सी मार्च २०२३ या परीक्षेत प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच या वर्षीच्या क्लासेसच्या १ली ते १० वीचा बेस्ट स्टुडंट अवार्ड मिळालेले विद्यार्थी सोनाली पवार, विवेक खूपसे, अनुजा नीलवर्ण, संमृद्धी कदम,यशोदा पाटील, निकिता बरसाले, दिव्या जोगडे, नारायण जावळे, प्रज्ञा सूर्यवंशी, स्वस्तिक गोरे, वैष्णवी खुरुसणे, शरद गायकवाड, दुर्गा भिसे, अक्षरा गाडेकर, किर्ती धोंगडे, गौरव भिसे,यश ताठे, कर्तव्य शेळके,करण सौदागर, आदित्य मोरे, वायाळ आरव, तौर आयुष या विद्यार्थ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक शुकाचार्य शिंदे, सुत्रसंचलण सतिश बरसाले, तर सुरेश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी , गिरीश पाईकराव, कमलाकर वायाळ,राम नखाते आदींनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

# पाथरी विधानसभा मतदार संघातील निवडणूक कर्मचार्यांचे पहिले प्रशिक्षण पाथरी येथे संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मानवत । प्रतिनिधी**



परभणी लोकसभा व ९८ पाथरी विधानसभा अंतर्गत १८७७ निवडणूक केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना प्रथम प्रशिक्षणासाठी एकुण १९ मतदान यंत्र हाताळणी कक्ष स्थापन करून प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले या सर्व प्रशिक्षण कक्षात सकाळ व दुपार सत्राला ५० निवडणूक अधिकारी कर्मचारी यांचे गट तयार करून मतदान यंत्र हाताळणी ' मॉकपोल व सिलींग बाबतची माहीती नियुक्त मास्टर ट्रेनर यांनी सविस्तर रित्या माहिती दिली

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश लाहोटी व तहसिलदार मानवत तथा प्रशिक्षण नियंत्रण अधिकारी पांडूरंग माचेवाड यांनी प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली

दरम्यान लोकसभा निवडणूक प्रथम प्रशिक्षणादरम्यान दोन सत्रात मतदान प्रक्रीया हाताळणीची माहीती पीपीटी ०दारे मानवत तहसिलचे तहसिलदार पांडूरंग माचेवाड यांनी दिली तर मतदान यंत्र कंट्रोल युनिट बॅलेट युनिट व्हि०हिपॅट हाताळणी व सिलींग कशा प्रकारे मतदान केंद्रावर करावी त्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक एम .एस. सोनवळकर विलास मीटकरी व किशोर तुपसागर यांनी दाखवलेनिवडणूक प्रक्रीया पारदर्शक पणे पूर्ण करण्यासाठी सर्व केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी काळजीपूर्वक काम करावे व सर्व प्रपत्रे अचुक भरावेत असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले सकाळी ९ ते १ व दुपारी २ते ५ दोन सत्रात नियुक्त निवडणूक अधिकारी / कर्मचारी यांनी ऊपस्थीत राहून प्रशिक्षण घेतले दुसरे प्रशिक्षण १६ एप्रील रोजी प्रत्येक विधान सभा मुख्यालयी दीले जाणार आहेप्रशिक्षण नियोजन पुर्ण करण्यासाठी तहसिलदार पाथरी हांदेशवार ' सोनपेठ चे तहसीलदार सुनिल कावरखे यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर तहसिलदार रणजित सिंह कोळेकर ' नायब तहिसलदार महाजन व जिवन धारासूरकर आणि पाथरी तहसिलचे निवडणूक विभाग चे श्री अन्नपुरे यांनी चोख प्रशिक्षण व्यवस्था करण्यात आली होती.

# साखरपुड्यात साध्या पद्धतीने लग्न समारंभ करा-कृषिरत्न आबासाहेब मोरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा**

हुंडा घेणे व हुंडा देणे ही प्रथा बंद करा कारण लग्न झाल्यानंतर घरात लक्ष्मी सुनेच्या रूपाने येते आणि तिच्या वडिलाकडून हुंड्याच्या स्वरूपात पैसे घेणे हे प्रथा पूर्णपणे चुकीची असून ही कालबाह्यप्रथा बंद करा असे आव्हान कृषीरत्न आबासाहेब मोरे यांनी केले तारीख ३१ मार्च रोजी सर्व धर्मीय वधू वर परिचय संमेलन आयोजित केले होते या कार्यक्रमात बोलताना त्यांनी उपरोक्त प्रतिपादन केले.

पुढे बोलताना कृषिरत्न आबासाहेब मोरे म्हणाले भारतीय संस्कृती व भारतीय परंपरा याचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे लग्न विवाह सारख्या जीवनातील अति महत्त्वाच्या क्षणी विनाकारण खर्च पाणी करू नका कमी वेळात साखरपुड्यात थोडक्यात लग्न समारंभ पार पाडा तसेच शेतकऱ्यांनी आता आधुनिक पद्धतीने शेती करावी कारण शेतीला लवकरच पूर्वीप्रमाणे चांगले दिवस येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सर्व धर्मीय वधू वर परिचय मेळाव्याला खासदार प्रतापराव जाधव आमदार संजय रायमुलकर व विदर्भातील ११ जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात श्री स्वामी समर्थ सेवेकरी उपस्थित झाले होते या कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले होते.



# योगी शाम महाराज भारती हिंगोली लोकसभा मतदार संघातून अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

हिंगोली लोकसभा मतदार संघ सहा विधानसभा मतदार संघाचा असून २०१९ च्या लोकसभेत शिवसेना भाजपा युतीचे हेमंत पाटील यांचा ५,८३,३९२ मते मिळवून दणदणीत विजय मिळवून दिला होता, आणि त्यात भारतीय जनता पार्टीचे मोठे योगदान असलेला जिल्हा असून खा, हेमंत पाटील यांनी फक्त आणि फक्त शिवसेना पक्ष वाढवण्यासाठी काम केलेले असून भारतीय जनता पार्टी च्या कार्यकर्त्यांना मागे फिरवण्याचं काम करून भाजपा नेत्याचा फोन उचलण्या वेळ नाही, सामान्य जनतेचा प्रश्न सोडा काही राजकीय सामाजिक अडचणीत फोन करत असलेल्या कार्यकर्त्यांची गळचेपी करून जिल्ह्यातील अनेक प्रश्न सामाजिक शेतकऱ्यांना अशा अनेक गम्भीर समस्या ला सामोरे जावे लागले आहे, खा, हेमंत पाटील यांनी भाजपा कार्यकर्त्यांना केराची टोपली दाखवत आपल्या पोळ्या भाजून फक्त शिवसेना कशी वाढेल याकडे भर दिला, हिंगोली मतदार संघातील मतदार मायबाप यांनी जेवढा विश्वास ठेवून लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले, पण खा, हेंमत पाटील यांनी गुंडगिरी दहशत निर्माण करून हिंगोली मतदार संघातील भाजपा नेत्याची खा,हेमंत पाटील यांनी भाजपा नेत्यांना विचारात न घेता एकतर्फी कार्यक्रम चालवले ते तर सोडा पण खा, हेमंत पाटील यांच्यासमोर बोलण्याची हिम्मत होत नसून आता हिंगोली मतदार जागा करून भारतीय जनता पार्टीचे वरिष्ट नेते यांनी भाजपा ला जागा सोडावी अन्यथा भाजपा आणि शिवसेना युतीचा धर्म फक्त भाजपने पाळणे हा काही नियम नाही जर लोकप्रतिनिधी जर जनतेच्या मनातून बाहेर फेकले गेलेल्या लोकांना लोकप्रतिनिधी म्हणून संधी मिळू देणार नाही, या गुंडशाही विरोधात आज ३ एप्रिल २०२४ बुधवार रोजी दुपारी १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक हिंगोली येथून सर्व जणसामान्य न्याय व हक्क मिळवन्यासाठी नामांकन अर्ज दाखल करनार आहोत्त या साठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान भावी खा, योगी धनेश्वर उर्फ शाम महाराज भारती माहूरगड यांनी दिले,



# माढा मतदारसंघातून रमेश बारस्कर तर सोलापूर लोकसभा मतदारसंघातून गायकवाड यांना उमेदवारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर (वृत्तसंस्था)**



आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने दुसऱ्या टप्प्यातील राज्यातील ११ उमेदवारांची यादी आज जाहीर केली आहे. यामध्ये मोहोळचे माजी नगराध्यक्ष व ओबीसी नेते रमेश बारसकर यांना माढा लोकसभा मतदारसंघातून तर अक्कलकोट तालुक्यातील राहुल गायकवाड यांना सोलापूरमधून उमेदवारी मिळाली आहे. सातारा लोकसभा मतदार संघातून मारुती जानकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर व राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी यासंदर्भातील आज घोषणा केली आहे. माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश चिटणीस व धाराशिव जिल्ह्याचे निरीक्षक म्हणून काम पाहत होते. त्यांनी आठ दिवसांपूर्वी या पदाचा राजीनामा दिला आहे. माढ्यामध्ये ओबीसी महासंघाच्या वतीने झालेल्या मेळाव्याचे निमंत्रक म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन ड. आंबेडकर यांनी माढा लोकसभा मतदारसंघात ओबीसी चेहरा म्हणून बारसकर यांना संधी दिली आहे.सोलापूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळालेले राहुल गायकवाड हे अक्कलकोट तालुक्यातील आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते हे बाहेरचे असल्याचा आरोप सध्या काँग्रेसच्या वतीने सुरू आहे. भाजपने स्थानिक उमेदवार दिला नाही, अशी चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर लोकसभा मतदारसंघातील स्थानिक युवा उमेदवार म्हणून ड. आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून गायकवाड यांना संधी दिल्याचे दिसते.

# उदगीर तालुक्यातील नळगीर चे विद्यामान सरपंच सौ.अंजुषा उगीले व पती ॲड.पद्माकर उगिले यांचा अपिलार्थी अर्ज फेटाळला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

उदगीर तालुक्यातील मौजे नळगीर येथील सरपंच सौ अंजुषा पद्माकर उगिले आणि त्यांचे पती जे ग्रामपंचायत सदस्य होते ते पद्माकर उगिले यांचे सदस्यत्व आणि सरपंचाचे सरपंच पद आणि सदस्यत्व रद्द करून सदरील जागा रिक्त असल्याचा निर्णय लातूर जिल्हाधिकारी यांनी जयप्रकाश नरदेव कापसे यांच्या अर्जावर निकाल देताना दिला होता. या निकालाच्या विरुद्ध सौ अंजुषा उगीले आणि पद्माकर उगिले या दोघांनीही अप्पर विभागीय आयुक्त क्रमांक १, छत्रपती संभाजी नगर यांच्या न्यायालयात जिल्हाधिकारी लातूर, जयप्रकाश नरदेव कापसे, मनोज अशोकराव शेटकर, ग्रामपंचायत कार्यालय नळगीर मार्फत ग्रामसेवक, उपसरपंच किंवांडे शंकर सूर्यकांत, प्रशांत विश्वनाथ गायकवाड यांना प्रतिवादी करून अपील केले होते. जिल्हाधिकारी यांचा निकाल स्थगित करावा,अशी विनंती सदरील आपल्यामध्ये करण्यात आली होती. जिल्हाधिकारी लातूर यांचे आदेश क्रमांक २०२४ / ग्रापनी/सी आर- ६३ दिनांक १/ ३/ २०२४ च्या आदेशाच्या नाराजीने या न्यायालयात अपील दाखल केले आहेत. अपील अर्जाची छाननी करून प्रकरणातील निगडित असलेल्या सर्व संबंधितांना नोटीस निर्गमित करण्यात आली, सदर प्रकरणात अपिलाच्या अनुषंगाने अपिलर्थि व प्रतिवादी या दोन्ही विधिज्ञांची सुनावणी दिनांक २० मार्च २०२४ रोजी स्थगिती अर्जावर केलेला युक्तिवाद ऐकून घेऊन प्रकरण स्थगितीच्या निर्णयासाठी राखीव ठेवण्यात आले होते. त्या संदर्भाने २२ मार्च २०२४ रोजी अप्पर विभागीय आयुक्त बाबासाहेब बेलदार यांनी आपला निकाल देताना आदेश केले आहेत की, अपिलार्थी सौ. अंजुषा पद्माकर उगिले आणि पद्माकर मनोहर उगिले यांचा स्थगिती अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. नियमित सुनावणी दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी ठेवण्यात आली आहे. तसेच सर्व संबंधितांना या संदर्भात कळविण्यात यावे, असे आदेश दिलेले आहेत. या निकालामुळे नळगीर येथील राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू असून जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाला कायम केल्याबद्दल प्रतिवादी आनंद व्यक्त करत आहेत.



# विभागीय सहनिबंधकाच्या निर्णयाने तत्कालीन सभापती शिवाजीराव हुडे यांना मोठा धक्का

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सुनिल बस्वराज हावा । उदगीर**

लातूर येथील विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी स्वाती सचिन हुडे यांचा नूतनीकरणाच्या संदर्भातील अर्ज फेटाळून लावत, एस एच हुडे या फार्मचे प्रोप्रायटर शिवाजी हनुमंतराव हुडे हेच असल्याचे निरीक्षन यापूर्वी तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नोंदवले होते, ते कायम ठेवले आहे. त्यामुळे सभापती शिवाजीराव हुडे यांना हा निकाल म्हणजे एक प्रकारचा धक्काच असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात चालू आहे.




याबाबत थोडक्यात माहिती अशी की, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीने दिनांक ३० मे २०१९ रोजी शिवाजी हनुमंतराव हुडे यांना अनुज्ञप्ती नूतनीकरणाच्या बाबतचा ठराव घेऊन दिनांक ९ जुलै २०१९ रोजी पत्र दिले होते. तसेच या संदर्भाने यापूर्वी स्वाती सचिन हुडे यांनी दाखल केलेला नूतनीकरणाचा अर्ज प्रलंबित ठेवला होता. तसेच स्वाती सचिन हुडे यांना नूतनीकरणाचा अर्ज करता येणार नाही. असे सूचित केले होते.

या पत्राच्या विरुद्ध स्वाती सचिन हुडे यांनी उपविभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्याकडे अपील दाखल केले होते. या अपीलाची सुनावणी होऊन, सर्व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेऊन महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. या निकालात निष्कर्ष व अभिप्राय नोंदवताना स्पष्ट केले आहे की, २०१७ च्या संचालक मंडळाच्या निवडणुकात शिवाजी हूडे यांना तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ते मे. एस एच हूडे या फर्मचे प्रोप्रायटर असून व्यापारी असल्याचे नमूद केले होते. व निवडणुकांमध्ये त्यांचा सहकारी संस्था मतदार संघातील अर्ज अवैध ठरवला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या या निकालाच्या विरुद्ध शिवाजी हुडे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. मात्र तेथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द झाली होती. या संदर्भात उच्च न्यायालयाने शिवाजी हुडे यांना योग्य त्या प्राधान्यकरणाकडे दाद मागण्याची मुभा देऊन त्यांना व्यापारी असल्याचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय कायम ठेवला होता.

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तत्कालीन संचालक मंडळांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत दिनांक ३०/ ५/ २०१९ रोजी ठराव घेतला होता, व शिवाजी हूडे यांना एस एच हूडे या फर्मचे अनुज्ञप्ती नूतनीकरणाचे पत्र दिले होते. तसेच स्वाती सचिन हुडे यांना नूतनीकरण करता येणार नाही, असे पत्र दिले होते. या ठरावाच्या विरुद्ध एक जानेवारी २०२३ रोजी स्वाती सचिन हुडे यांनी विधीज्ञ डी एस पांचाळ यांच्यामार्फत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्याकडे अपील दाखल केले होते. त्या अपिलावर दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुनावणी होऊन स्वाती सचिन हुडे यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे, व स्वाती सचिन हुडे यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. या निकालामुळे शिवाजी हूडे यांना धक्का असल्याचे मत उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सहकार महर्षी भगवानदादा पाटील तळेगावकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# संघर्षावर मात करत उजमा शेखने यांनी घातली पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी-रवि ढोबळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

पाचवीला पुजलेली गरिबी,घरात अठराविश्वं दारिद्र्य,परिस्थिती मुळे शिक्षणाची अडचण,आई स्वयंपाकी म्हणून करणे, त्याच्यावरच कुटुंबाची गुजराण; मात्र नुसती पोटाची आग विझली म्हणजे संसार होत नाही, पोरांना शिकवणं,त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे खरे पालकांची जबाबदारी. अन ती जबाबदारी ओळखून आई सायरा शेख यांनी शाळेत स्वयंपाकी म्हणून काम करत चार पैसे गाठीला बांधून उजमाला चांगलं शिक्षण दिले आणि त्याचे चीज करीत अखेर उजमानेही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होत पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली अन आईचे स्वप्न पूर्ण केले.शाळेत भात शिजवणार्या स्वयंपाकीच्या पोरीने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मिळविले यश पाहून सारे शहर आनंदून गेला.अवघ्या चार महिन्यातच वडिलांचे छत्र हरविलेल्या उजमा



शेख या तरुण तडफदार आणि तितक्याच सहनशील आणि चिकाटीवृत्तीच्या जिद्दी उजमाने आकाशाला गवसणी घातल्याचे गौरवोद्गार सत्कार करताना काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रविकाका ढोबळे यांनी काढले.आष्टी सारख्या ग्रामीण भागात शिकून सुद्धा उजमा शेख आज पोलिस उपनिरीक्षक झाली असून तिने अतिशय बिकट परिस्थितीत सुध्दा मुलामुलींनी हार न मानता आपले जीवनात ठेवलेले उद्देश सफल करता येतो,उजमाने आपल्या घरातील बाथरूम चे रूपांतर स्टडी रूम मध्ये करून अतिशय चिकाटीने अभ्यास करून यश प्राप्त केले आहे,नाहीतर आजकाल ची तरुण पिढी छोट्या छोट्या गोष्टीचे कारण सांगून याकडे दुर्लक्ष करत आहेत म्हणून आजच्या तरुण पिढीने उजमाचा आदर्श घेऊन अभ्यास करावा असेही रविकाका ढोबळे म्हणाले.यावेळी काकासाहेब कर्डिले,अजिनाथ महाडिक,बाळू कटके,जालिंदर लष्कर, नजमुद्दीन शेख,वसंत चव्हाण आदीनी उजमाचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## फुलचंदराव कराड यांच्या जाण्याने कसलाच आणि कोणताच परिणाम होणार नाही

# माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या सोबत बीड जिल्ह्यातील अठरा पगड जाती-गोकुळ सानप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा भाजपाचे जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी नूकताच भाजप मधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटात पक्ष प्रवेश करून घेतला असला तरी याचा फारसा परिणाम भाजपाला होणार नाही असे पत्रक शिरूर कासार तालुका भाजपचे युवा नेते गोकुळ सानप यांनी प्रसिध्दीस दिले आहे. या मध्ये भाजपाचे जेष्ठ नेते फुलचंदराव कराड म्हणाले की त्यांना सतत डावलण्यात येत आहे कार्यक्रमाला आमंत्रण दिले जात नसायाचे असे आरोप करत कराड यांनी भाजप पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. मात्र फांदीला आले मोडायाचे कावळ्याला आले उडायाचे असा प्रकार कराड साहेब यांच्या बाबतीत झाला आहे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब हयात असताना फुलचंदराव कराड यांना



एस.टी महामंडळाचे संचालक, भाजपाचे अनेक वर्षे जिल्हाध्यक्ष ही ओळख स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी महाराष्ट्रभर मिळवून दिली हे फुलचंदराव कराड यांनी विसरू नये आणि फुलचंदराव कराड यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटात जाण्याने कसलाच आणि कोणताच परिणाम माजी मंत्री पंकजाताई मुंडे, खासदार प्रितमताई मुंडे यांच्या वर होणार नसल्याचे सानप यांनी पत्रकातुन म्हटले आहे. तसेच पुढे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात शिरूर कासार भाजपाचे युवा नेते गोकुळ सानप म्हणाले की होऊ घातलेल्या लोकसभा निवडणूकीत माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या सोबत अठरा पगड जाती समाज आहे त्या मुळे पंकजाताई मुंडे या लाखोंच्या मतांनी विजयी होणार आहेत. लोकसभा निवडणूकीत रायमोहा जिल्हा परिषद गटातून, रायमोहा पंचायत समिती गणातून खासदार प्रितमताई मुंडे, आमदार सुरेश आण्णा धस, माजी आमदार भीमराव धोंडे, अभ्यासू कर्तव्यदक्ष जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, सर्जेराव तात्या तांदळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयकुमार गोल्हार, वैजिनाथराव मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली जिवाचे रान करून लोकसभेच्या उमेदवार माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांना मतांची आघाडी मिळवून देणार असल्याचे शिरूर कासार भाजपाचे युवा नेते गोकुळ सानप यांनी पत्रकातुन म्हटले आहे.

# समाजातील आर्थिक विषमता दुर करणेसाठी रोहयो मजुरांना किमान ७०० ते १००० रुपये रोज द्यावा-भाई विष्णुपंत घोलप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने २७/०३/२०२४ रोजी अधिसुचना जारी करुन रोहयो वरील मजुरीत ०४ ते १० टक्के वाढ घोषित करुन ०१ एप्रिल २०२४ पासून त्याची अंमलबजावणी होणार आहे. महाराष्ट्रात रोहयो मजुरांना २७३/- रुपयावरुन २९३/- रुपये मजुरी देण्यात येणार आहे. परंतु मजुरांना वर्षातुन किमान २०० दिवस हाताला काम आणि ७०० ते १००० रुपये किमान मजुरी देण्यात यावी, जेणे करुन समाजातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. आणि जो पर्यंत रोहयो वरील मजुरी वाढणार नाही तो पर्यंत शेतकऱ्यांच्या पिकाचा उत्पादन खर्चावरील हमीभाव योग्य मिळणार नाही. केंद्र आणि राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या किमान आणि कमाल वेतनाचा विचार केल्यास १००० ते १०००० हजार रुपये रोज एक दिवसाला वेतन रुपाने मिळत आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवर काम करणारा कामगार माती, मुरुम, दगडाशी संघर्ष करत असतो त्याला ऊन, वारा, पावसाचा विचार करता त्याचा खुप मोठा संघर्ष आहे. त्याला दिवसभर काम करतांना घाम गाळावा लागतो त्याला सरकार अकुशल मजुर म्हणत आहे. सध्या आईतखाऊला साहेब आणि कष्टकरणाऱ्यांना सध्याच्या व्यवस्थेमध्ये गाढव समजले जात आहे. शासनाचा शेवटच्या श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या बरोबरीत तरी रोहयो वरील मजुरांना मजुरी मिळाली पाहिजे. त्यासाठी मजुरांना वर्षातुन किमान २०० दिवस हाताला काम आणि ७०० ते १००० रुपये किमान मजुरी देण्यात यावी जेणे करुन समाजातील आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. जो पर्यंत रोहयो वरील मजुरी वाढणार नाही तो पर्यंत शेतकऱ्यांच्या पिकाचा उत्पादन खर्चावरील हमीभाव योग्य मिळणार नाही. त्या साठी केंद्र सरकारने आर्थिक समानता करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी वरील मजुरी तात्काळ वाढवावी नसता आर्थिक विषमतेची दरी खुप मोठी होईल ती देशाच्या अस्थिरतेला कारणीभुत ठरेल याची काळजी घ्यावी असे लेखी निवेदन शेकापचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत केंद्रीय ग्रामविकास व पंचायत राजमंत्री गिरीराज सिंह यांना पाठविले आहे. माहितीस्तव राज्याचे रोहयो मंत्री संदीपानजी भुमरे, मा. जिल्हाधिकारी, बीड तसेच शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

# सचिन गायकवाड यांना स्टार ऑफ एम.जी.एम.अवार्ड ने सन्मानित

## मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते पुरस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील कळका येथील सचिन बाजीराव गायकवाड यांना स्टार ऑफ एम.जी.एम.अवार्ड हा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले आहे, यावेळी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते एम.जी.एम.कॉलेज नांदेड महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक,सर्व स्टाफ,विद्यार्थी, विद्यार्थीनी यांच्या उपस्थितीत स्टार ऑफ एम.जी.एम.अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.त्याबद्दल त्यांचे सर्वत्र



स्तरांवर कौतुक केले जात आहे, अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षकेतर,कर्मचारी,विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# वयाच्या पाचव्या वर्षी शेख उमर फारोख ने केला पवित्र माहे रमजान मधील पहिला रोजा पूर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

इस्लाम धर्मामध्ये पवित्र माहे रमजान महिन्याला अनन्य साधारण महत्व आहे. या महिन्यात मुस्लिम बांधव यांच्या वर रोजा(उपवास) फर्ज(बंधनकारक) करण्यात आलेले आहे. लहानापासून ते मोठ्या व्यक्ती पर्यंत सर्वच पवित्र माहे रमजान महिन्यांमध्ये रोजा धरतात. पालकांना रोजा(उपवास) करतांना पाहून घरातील लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते व लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा (उपवास)धरतात व पूर्ण हि करतात. अशाच प्रकारे क्रांतीनगर पाटोदा येथील शेख अजहर नजीर यांचा पुतण्या व शेख फारोख नजीर यांचा मुलगा वय वर्षे ०५ यांने आपल्या आयुष्यातील माहे रमजान मधील पहिला रोजा पुर्ण केला. मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या माहे रमजान महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर अन्न व पाणी न घेता हे



रोजा (उपवास)ठेवला जातो. सध्या वाढलेल्या तापमानाचा व उष्णतेचा मोठ्या माणसांना देखील खूप त्रास होत असताना त्यात या ०५ वर्षाच्या शेख उमर फारोख या चिमुकल्याने पहिला रोजा ठेवला व पुर्ण केला. त्याचे या बद्दल कुटुंबियांसह, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र परिवाराने कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र यांच्या वतीने रुग्णांसाठी मोफत वाहन सेवा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

अल्पावधीतच डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी नावारूपात आलेल्या जिजाऊ सृष्टी ट्रस्ट द्वारा संचलित जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र मातृ तीर्थ सिंदखेडराजा यांच्यावतीने सिंदखेडराजा बस स्टॅन्ड ते जिजामाता हॉस्पिटल पर्यंत मोफत वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे या मोफत वाहन सेवेचे उद्धाटन दि.१ एप्रिल २०२४ रोजी करण्यात आले.




जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्र येथे डोळ्यांच्या शस्त्रक्रिया अल्प दरात केल्या जात असून आतापर्यंत असंख्य यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

त्याचबरोबर हॉस्पिटलच्या वतीने ग्रामीण भागात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येत असून आजपर्यंत हजारो रुग्णांनी या शिबिरांचा लाभ घेतला आहे.

हॉस्पिटलमध्ये येणारे बहुसंख्य रुग्ण हे ग्रामीण भागातून येत असतात व सिंदखेडराजा बस स्टॅन्ड ते जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्राचे अंतर जास्त असल्या कारणामुळे खाजगी वाहन धारकांकडून रुग्णांची होणारी लूट बघता जिजामाता हॉस्पिटल व महिला आरोग्य केंद्राचे प्रकल्प प्रमुख मा.पुरुषोत्तम कडु पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत वाहन सेवेची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदरील मोफत वाहन सेनेच्या व्हॅनचे उद्धाटन मराठा सेवा संघाचे सिंदखेडराजा तालुका अध्यक्ष ॲड.राजेंद्र ठोसरे व नामदेव तुकाराम वारकरी परिषदेच्या प्रदेश महासचिव ज्योतीताई जाधव, जिजाऊ महिला अर्बन बँकेचे मुख्याधिकारी प्रा.डॉ.निलकुमार बंगाळे,मनविसेचे जिल्हाध्यक्ष शिवादाद पुरंदरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी जिजामाता हॉस्पिटलचे प्रकल्प संचालक समाधान देशमुख, अतिश राजे जाधव, डॉ.सिमोन भालेराव, डॉ.अभिजीत टेकाळे, बाळासाहेब कठोरे,सचिन जाधव,लता मगर,माही देशमुख,अनिता कांबळे,विठ्ठल झगरे, सुरेंद्र कहाळे आदी उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904